|| ॐ ||

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

जुलै २०२४

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org







## साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा

**वरील ओळीचा प्रत्यय या वर्षीच्या वारी सोहळ्यात आला. माऊलींची वारी पुण्यनगरीत दाखल झाली आणि आमचे लहान मोठे सर्व कार्यकर्ते वारकऱ्यांची सेवा करण्यात रंगून गेले.**

● कर्वेनगर भागात २ दिवस निवासी असलेल्या वारकऱ्यांसोबत शाहू शाखेतील वर्धकांनी अनौपचारिक गप्पा मारल्या. मुलांनी वारकऱ्यांना प्रश्न विचारून संपूर्ण वारीची माहिती संवादातून जाणून घेतली. उदा.वारीचे नियोजन, पंढरपूरचे वर्णन, वारीमध्ये येण्यामागचा हेतू, प्रेरणा, पुणे-सासवड भागातील लोकांचे आलेले अनुभव अशा विविध विषयांवर, प्रश्नांवर वर्धकांनी चर्चा केली. वयस्कर आजी, आजोबांचे पाय दाबून दिले, तेलाने मालीश करून दिली. ● समर्थ रामकृष्ण शाखेतील मुलांनी बारणे शाळेत मुक्कामी असलेल्या वारकऱ्यांच्या भजन आणि भारुडा मध्ये सहभाग घेतला. ● क्रांतीज्योती सावित्री शाखेत वर्धिकांनी मुक्कामी असणाऱ्या वारकरी बांधवांची विचारपूस केली, त्यांची सेवा केली. वर्धिनीची माहिती वारकऱ्यांना सांगितली. ● स्वामी दयानंद शाखेने अनोख्या पद्धतीने वारी साजरी केली. वारी बद्दलची सखोल माहिती वर्धकांना व्हावी यासाठी ‘बोल भिडू’ या चॅनेलवरील ‘वारी’चे व्हिडिओ दाखवण्यात आले. तसेच ह.भ.प. श्री. सचिन पवार यांनी वारीचे अनुभव सांगितले. ● अशीच अनोखी वारी निवेदिता शाखेनेही साजरी केली. संतांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग शाखेत बसवून घेतले आणि त्याचे सादरीकरण वर्धिनी कार्यकर्ते, पालक यांच्या समोर करण्यात आले.

वारी सोबत वर्धिनीत आषाढी एकादशी निमित्त विशेष उपक्रमही झाले. त्यामध्ये अभिमन्यू बालशाखा आणि बालवाडीतील बालचमूंनी आषाढी एकादशी निमित्त याही वर्षी वर्धिनीपासून कण्वाश्रम मंदिरापर्यंत पायी पालखी नेली. अभंग, विठ्ठलाचा नामघोष, राम कृष्ण हरीची साद, पारंपारिक पोशाखातील छोटे वारकरी आणि विशेष म्हणजे या बालचमूंनी बसवलेले रिंगण. या सर्व गोष्टींनी वातावरण पंढरीमय झाले.

‘विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल’, असा विठूनामाचा जयघोष करत उत्थान विभागातील वर्धक वारकऱ्यांच्या वेशभूषेत जगत्‌गुरु संत तुकाराम व ज्ञानेश्वर माऊली यांच्या पालखीत सहभागी झाले. शिवराय अभ्यासिकेतील मुलांनी पैसे साठवून त्या पैशातून सर्व साहित्य आणले व स्वतः चिवडा तयार करून तो वारकऱ्यांना वाटला. काही ठिकाणी वारकऱ्यांची सेवा ही भोजन वाढण्याच्या माध्यमातून केली. न थकता वर्षानुवर्षे विठुरायाची भक्ती करणाऱ्या या वैष्णवांचा मेळा पुण्यनगरीत दरवर्षी येतो आणि वर्धक अशा छोट्या मोठ्या उपक्रमातून त्यात सहभागी होतात

# वारी विशेष उपक्रमातील क्षणचित्रे





विठूराया देवा । दारी तुझ्या आलो ।।
कासावीस झालो । भेटीसाठी ।।
भेट तुझी होता । मन शांत होते ।।
भान हरपते । अस्तित्त्वाचे ।।
आनंदते मन । तुझ्या दर्शनाने ।।
म्हणूनी नेमाने । वारी होवो ।।
विठूराया देवा । वंदन करितो ।।
ठेवितो मागणे । तुझ्या पायी ।।
नको अनारोग्य । नको अपघात ।।
घातपात कोठे । होऊ नये ।।

नको अनावृष्टी । नको अतिवृष्टी ।।
बहरावी सृष्टी । तुझ्या कृपे ।।
नको भ्रष्टाचार । घडो सदाचार ।।
रूजावा विचार । सन्मार्गाचा ।।
नको जातीवाद । नको सत्तामाज ।।
सकल समाज । एक व्हावा ।।
ठेवितो मस्तक । पायी तुझ्या देवा ।।
आशिर्वाद द्यावा । पामराला ।।

**- शिरीष पटवर्धन**





# शाखा विभाग

स्वामी विवेकानंद शाखेत जून महिन्यात मैदान विभागाने नियोजनपूर्वक सूर्यनमस्कार, जोर बैठका, योगासने आणि खेळ घेतले. समर्थ रामकृष्ण शाखेत कार्यक्रम विभागाने shark tank, वाद विवाद स्पर्धा, River walk, shadow act असे वैविध्यपूर्ण उपक्रम घेतले. स्वामी दयानंद शाखेत पद्यमंजुषा, मॅन ऑफ आर्टस्, जाहिरात अशा स्पर्धा घेण्यात आल्या. नरवीर तानाजी मालुसरे शाखेत (तासिका व्यवस्था) पाढे पाठांतर, वाचन वर्ग नियमित अभ्यास तासिका अशी रचना होती. अखंडानंद शाखेचे स्व-अभ्यास, दैनंदिनी लेखन, शंका निरसन असे नियोजन होते तर शंभूराजे शाखेत विज्ञान, स्व-अभ्यास, वाचन यावर भर देण्यात आला. संपर्क हा शाखेचा आत्मा. हाच धागा पकडून अभेदानंद शाखेने जून महिन्यात '३० दिवस ३० घरी संपर्क' ही मोहीम यशस्वी केली.

ब्रम्हानंद शाखेने २९ व ३० जूनला सिंहगड येथे २७ वर्धकांच्या सायकल सहलीचे आयोजन केले











# युवा विभाग

## युवक शिबिर २०२४-२५

**'हम युवा है, हम करे मुश्किलों से सामना ।
मातृभूमी हित जगाये, है हमारी कामना ।'**

युवक शिबिर म्हटलं की आठवते ते आपल्या जुन्या मोठ्या युवक दादांसोबत घालवलेला वेळ, त्यांचा मिळालेला अनुभवी सहवास, विविध उपक्रम आणि सत्रांच्या माध्यमातून समजलेल्या नवीन गोष्टी आणि त्यातून प्रेरणा घेऊन शाखेचे काम निरंतर करत राहण्याची मिळालेली शिकवण.

शिबिर ठिकाण शिबिराचा उत्साह वाढवते. यावर्षी शिबिर निसर्गरम्य वातावरणात आणि ऊर्जेचे केंद्र असणाऱ्या संत सेवा संघ, कामथडी येथे १७ ते १९ जून या कालावधीत संपन्न झाले. तेथील विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर, नाथ मंडप, निवासव्यवस्था, भोजनगृह आणि सभागृह हे सर्वच जणू चैतन्याने भारलेले. यावर्षीच्या शिबिरातील मैदानात शारीरिक कस लावणारे मैदानी खेळ, दणकून व्यायाम नक्कीच स्मरणात राहील. खरं तर नेहमीसारखेच भोजन असूनही त्या वातावरणात जेवणाला एक वेगळीच चव जाणवत होती. श्री. भरत अमदापुरे आणि श्री. चंदन हायगुंडे यांनी केलेली सद्य परिस्थितील समाजातील आव्हाने याची मांडणी असेल किंवा श्री. अजित नाईक आणि मा. पुष्पाताई यांनी केलेले अनुभव कथन असे सर्वच भारावणारे व प्रेरणादायी होते. समाजातील सध्याची परिस्थिती, वर्धिनीच्या कामाची गरज आणि युवक म्हणून आपली भूमिका हे सर्व चित्र स्पष्ट होत होते. या शिबिरातून मला शाखा काम करण्याची प्रेरणा, वैयक्तिक आयुष्यात मोठे ध्येय गाठण्याची ऊर्जा आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे संघटनेतील शिस्त या गोष्टी खऱ्या अर्थाने समजल्या. हे शिबिर दैनंदिन शाखा काम फुलवण्यास मार्गदर्शक ठरेल.

**– आदित्य सुळे**























**युवक शाखा –**

दि. २ जूनच्या युवक शाखेमध्ये फुटबॉलचा जंगी सामना होऊन वर्षभरात युवक शाखेत कोणकोणत्या गोष्टी व्हायला हव्यात, कोणत्या विषयावर भर दिला पाहिजे, नियमित युवक शाखेचे महत्त्व, आगामी काळातील आव्हाने यावर निर्माण व नेतृत्व गटात चर्चा झाली.

**उपस्थित संख्या – ३६**

दि. १० जूनला श्री. डॉ. अजित वामन आपटे यांनी शिवरायांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू मांडताना पाटील लायजी कोळी यांची गोष्ट, जंजिरा लढाई, शिवरायांचा माणसे जोडण्याचा दृष्टिकोन, पुरंदरचा तह करताना शिवरायांचा विचार अशा मुद्द्यांना स्पर्श केला. युवकांची प्रेरणा असणाऱ्या शिवरायांचे चरित्र त्यांनी उलगडले.

**उपस्थित संख्या – ४६**

दि. ३० जूनला बीड जिल्हा दुष्काळ अभ्यास दौरा करून आलेल्या गटाने युवकांसमोर अभ्यासपूर्ण मांडणी केली. त्यात हवामान परिस्थिती, कृषी स्थिती, पाणी स्त्रोत, पर्जन्यमान, सामाजिक परिस्थिती, दुष्काळ व्यवस्थापनातील आव्हाने, स्थानीय समुदायाची भूमिका, जनजागृती, भूजल पुनर्भरण या सर्व मुद्द्यांवर ppt माध्यमातून मांडणी केली.

**उपस्थित संख्या – ३४**

# समुपदेशन विभाग



वर्धिनीच्या शाखा विभागातील एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे दरवर्षी होणारी निवड चाचणी. वर्धिनीच्या शाखेत प्रवेश मिळवण्यासाठी मुलांना ही चाचणी यशस्वीरित्या पूर्ण करावी लागते. समुपदेशन विभागातर्फे शास्त्रीय पद्धतीने ही चाचणी घेतली जाते आणि त्यांची शाखेसाठी निवड केली जाते. यावर्षी जून महिन्यामध्ये विभागातर्फे विविध शाळांमध्ये निवड चाचणी घेण्यात आली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे – (शाळा–विद्यार्थी संख्या) – प्रेरणा विद्यालय – ७७, दरोडे विद्यालय – ४३, प्रगती विद्यालय – ९३, विश्वकर्मा विद्यालय – १६२, स्वामी विवेकानंद विद्यालय – १३, हिरामण बनकर शाळा – २००, ज्ञानसाधना विद्यामंदिर – ४८, विश्वकर्मा इंग्रजी माध्यम शाळा – २००, विमलाबाई गरबारे शाळा – ९५, सरस्वती विद्यामंदिर कर्वेनगर – १७०.

विभागाने दि. १० जूनला अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यांसाठी 'ताण तणाव व्यवस्थापन तंत्र' या विषयावर कृती उपक्रम, खेळ स्वरूपात सत्र घेतले. संवाद कौशल्य, ध्येय गाठताना अडथळ्यांवर मात, एकाग्रता, गटातील एकोपा असे अनेक महत्त्वाचे विषय खेळाच्या माध्यमातून उत्साही, खेळीमेळीच्या आणि आनंदाच्या वातावरणात विद्यार्थ्यांपर्यंत पोचले.



# उत्थान विभाग

## कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर –

दि. ७ व ८ जून रोजी 'कार्यकर्ता जडणघडण' विषयावर निवासी शिबिर संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन प्रसंगी श्री. शिरीष पटवर्धन सरांनी 'स्व'–रूपवर्धिनी म्हणजे काय, वर्धिनी कोणासाठी व कशासाठी हे स्पष्ट केले. चित्रपट हे अत्यंत प्रभावी माध्यम असल्याने 'झुंड' आणि 'तेजस' हे वास्तववादी प्रेरणादायी चित्रपट दाखवून त्यावर चर्चा झाली. शिबिरात शारीरिक क्षमता वर्धनासाठी व्यायाम, योगासने, खेळ यांच्या जोडीला भावनिक आणि मानसिक विकासासाठी उपासना व प्रबोधनही झाले. केदार घाटगे दादाने घेतलेल्या पद्य सत्रात नवनवीन पद्य ऐकून अभ्यासिका प्रमुख भारावून गेले. गोष्ट रचून प्रभावीपणे सांगा, कारण मुलांना गोष्ट हे माध्यम अतिशय जवळचे वाटते असे श्री. सुमित डोळे यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट केले. शिबिर समारोप प्रसंगी श्री. संजय तांबट सरांनी कार्यकर्ते कसे घडतात, हे अनेक उदाहरणांतून मांडले. या शिबिराच्या निमित्ताने कार्यकर्त्यांना वर्धिनी नव्याने समजली.








दि. १६ जून रोजी प्रियदर्शनी अभ्यासिकेच्या वर्धापन दिनास गाडीतळ पोलीस चौकीचे अधिकारी उपस्थित होते.

## पाकोळी बालवाडी

जून महिना सुरू होताच सर्व शिक्षिकांना मुलांना भेटण्याचे वेध लागतात. दरवर्षीप्रमाणे वार्षिक नियोजन बैठक होऊन बालवाडी शिक्षिकांना कामाविषयी अधिक स्पष्टता यावी यासाठी प्रेरणा शिबिर झाले आणि आगामी वर्षाच्या जबाबदाऱ्या आणि व्यवस्थांचे वाटप करण्यात आले.

- दि. १३ जूनला मुलांच्या स्वागताची जय्यत तयारी करून पारंपारिक पद्धतीने प्रत्येक मुलाचे औक्षण करून शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. पानाफुलांनी, रांगोळ्यांनी, पताकांनी, खेळण्यांनी सजलेल्या शाळेत मुले पहिल्याच दिवशी रमून गेली.
- 'झाडे लावा दारी समृद्धी येईल घरोघरी' अशा घोषणांच्या जयघोषात आपल्या बालचमूंची प्रभात फेरी दि. २० जूनला वटपौर्णिमेनिमित्त काढण्यात आली. अनेकांनी भेटून मुलांचे कौतुक केले.
- दि. २१ जूनला जागतिक योग दिनानिमित्त मुलांकडून विविध योगासनांचे सादरीकरण केले.







## विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा



**'संकट सांगून येत नाही,**
**दक्षता वाया जात नाही'**

विभागाने दि. ११ जूनला 'प्रशिक्षकांसाठी प्रथमोपचार प्रशिक्षण कार्यशाळा' आयोजित केली. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक होते : डॉ. मंदार अक्कलकोटकर (ट्रेनर - अमेरिकन हार्ट असोसिएशन) आणि श्री. मंगेश पडवळ (समन्वयक सांगाती संस्था). या कार्यशाळेत सदर कार्यक्रमास वर्धिनीच्या STML, रुग्णसेविका आणि स्पर्धा परीक्षा विभागातील ३७ कार्यकर्ते उपस्थित होते. पीपीटी, व्हिडिओ, प्रश्नोत्तरे आणि चर्चा या माध्यमातून स्वतःची सुरक्षा आपत्कालीन परिस्थितीत काय करावे आणि काय करू नये यासोबतच सीपीआरचे महत्त्व प्रात्यक्षिकाद्वारे समजून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय तांबोळकर यांनी तर आभार श्री. सुहासराव काणे यांनी व्यक्त केले. विभाग प्रमुख श्री. विश्वास कुलकर्णी यांनी प्रथमोपचार उपक्रमाची पुढील दिशा विषद केली.




## ध्येयाची परिपूर्ती



राजगुरुनगर तालुक्यातील लहानशा आंबोली गावात राहणाऱ्या **संदेश अशोक खंडागळे** याची नुकत्याच झालेल्या नगरपरिषद राज्यसेवा परीक्षा अंतर्गत 'नगरपरिषद लेखापाल/लेखापरीक्षक अधिकारी' या पदावर नियुक्ती झाली. या यशासंबंधीच्या संदेशच्या भावना त्याच्याच शब्दात देत आहोत.

"माझे शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबोलीमध्ये झाले. त्यानंतरचे कॉलेजचे शिक्षण हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आणि पदवीचे शिक्षण नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स पुणे येथे झाले.

सलून मध्ये काम करणाऱ्या माझ्या वडिलांनी आणि शिवणकाम करणाऱ्या माझ्या आईने मला अधिकारी बनवण्याचा ध्यास घेतला. २०१९ मध्ये 'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या स्कॉलरशिप बॅचची मला माहिती मिळाली. त्यात निवड झाली आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने स्पर्धा परीक्षांचा माझा प्रवास सुरू झाला. अभ्यासासोबतच केंद्राच्या 'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत मी समन्वयक म्हणून काम केले. आज मी मिळवलेल्या यशात केंद्राकडून मिळालेले मार्गदर्शन, प्रेरणादायी वातावरण याचे मोठे योगदान आहे. हा प्रवास असाच सुरू राहील कारण याहीपेक्षा महत्त्वाच्या पदांवरती काम करण्याची संधी मिळण्यासाठी मी सतत प्रयत्न करीत राहीन. या प्रवासात वर्धिनी आणि माझे आई-वडील माझ्यासोबत आहेत याची मला खात्री आहे."

## भावपूर्ण श्रद्धांजली

- वर्धिनीचे संस्थापक-सदस्य कै. पुरुषोत्तम श्रॉफ यांच्या कन्या **सौ. सुरेखा विनय मश्रुवाला** यांचे अल्प आजाराने निधन झाले. २००७ साली पुरुषोत्तम भाई आणि सुरेखा ताई यांनी त्यांच्या नावावर असलेली चऱ्होलीमधील १ एकर जागा वर्धिनीला दानपत्राने दिली होती.
- वर्धिनीच्या रामकृष्ण शाखेतील वर्धक **श्री. सचिन तुकाराम राऊत** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
- वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी आणि मरळवाडीचे सरपंच **श्री. बापू आंधळे** यांचे आकस्मिक निधन झाले.
- वर्धिनीच्या रामकृष्ण शाखेतील युवक श्री. श्रीधर देशमुख यांच्या मातोश्री **श्रीमती सिंधू शांताराम देशमुख** यांचे निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**